# प्रेसनोट

दि.११/०१/२०२२

## घोडेगांव ता.आंबेगांव, जि.पुणे येथील मंडल अधिकाऱ्यावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७,१२ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक - योगेश रतन पाडळे, वय - ३८ पद - मंडल अधिकारी, घोडेगांव विभाग, ता. आंबेगांव जिल्हा पुणे.<br>२) लक्ष्मण सखाराम गायकवाड, वय - ६१ वर्षे, खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ११/०१/२०२२.

ठिकाण :- तहसील कार्यालयासमोरील हॉटेलमध्ये

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे मामाच्या मुलाने खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार मंजुर करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.०१ याने १० हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता यातील आरोपी लोकसेवक क्र.०१ यानी तक्रारदार यांचे मामाच्या मुलाने खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार मंजूर करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे १० हजार रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वीकारली. आरोपी क्रमांक २ याने लाच मागणीस साहाय्य केले म्हणून दोघांवर घोडेगांव पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक अलका सरग तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>

२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००

५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**

६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.